# <u>मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद</u>

## वाहनचालक पदासाठी जाहिरात

### <u>क्र. प्रशासन/१७५०/२०१८, दिनांक : ०६/११/२०१८</u>

*मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद या आस्थापनेवर वाहनचालक पदाकरिता दिनांक २१/०६/२०१८ रोजी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या विस्तृत जाहिरातीनुसार सुदृढ व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते* ***तथापी, मुंबई उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार नव्याने या आस्थापनेवर "वाहनचालक" पदाकरिता <u>प्रत्येकी सहा उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी</u> तयार करण्यासाठी सुदृढ व पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.*** *सदर पदाची वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु. १९०० अधिक नियमानुसार देय भत्ते अशी राहील.*

***ज्या उमेदवाराने दिनांक २१/०६/२०१८ रोजीच्या जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज भरला होता आणि ज्याचा वैध वाहन परवान्यासह*** (Driving License) ***रुपये २००/- चा डिमांड ड्राफ्ट, स्पीडपोस्ट/रजिस्टर्ड पोस्टाने या कार्यालयास विहित मुदतीत प्राप्त झाला होता, <u>अशा उमेदवाराला नव्याने ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही.</u> त्याने दाखल केलेल्या अर्जाचा या प्रकियेदरम्यान नियमानुसार विचार करण्यात येईल. तथापी, या जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास (म्हणजे दिनांक ६/११/२०१८ रोजी) अशा उमेदवाराला, खालील मुद्दा क्रमांक (अ) नुसार पात्रता धारण करणे बंधनकारक राहील.***

**अ) <u>पात्रता</u> :-**

*१. उमेदवार किमान शालांत परीक्षा* (S.S.C.) *किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा.*

*२. उमेदवारास मराठी व हिन्दी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.*

*३. जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय किमान २१ व कमाल ३८ वर्षे असावे. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे आहे. उच्च न्यायालय किंवा राज्य/केंद्र शासकीय कर्मचा-यांस वयाची अट नाही.*

*४. उमेदवाराकडे जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास व त्यानंतर किमान १ वर्ष वैधता असणारा मोटर वाहन नियम १९८८ (क्र. ५९/१९८८) प्रमाणे आवश्यक असलेला, सक्षम अधिका-यामार्फत जारी केलेला वैध व कार्यरत असा किमान हलके मोटार*

वाहन (LMV) चालविण्याचा परवाना (Driving License) असावा.

५. उमेदवारास अर्ज करण्याच्या तारखेस हलके मोटर वाहन (LMV) चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६. उमेदवाराचा वाहन चालविण्याचा पूर्व कार्यकाल (रेकॉर्ड) स्वच्छ असावा. त्याचेविरुध्द कोणतेही फौजदारी प्रकरण/खटला प्रलंबित नसावे. तसेच त्यास न्यायालयाने कोणत्याही प्रकरणात शिक्षा केलेली नसावी.

७. उमेदवार हा कायदेशिररित्या करार करण्यास सक्षम असावा. तसेच तो कोणत्याही कायद्यान्वये या पदासाठी अपात्र नसावा.

८. उमेदवारास मोटर वाहनाची देखभाल व किरकोळ दुरुस्तीचे किमान ज्ञान असावे.

९. उमेदवारास औरंगाबाद शहरातील रस्त्यांची व महत्वाच्या ठिकाणांची माहिती असावी.

१०. उमेदवार शारीरिकदृष्ट्या सुदृढ आणि निर्व्यसनी असावा.

११. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास दोनपेक्षा अधिक हयात मुले नसावीत. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे उमेदवार सदरील पदासाठी अपात्र ठरेल.

**ब)** **<u>अर्ज करण्याची पध्दत</u>** :-

१. प्रस्तुत निवड प्रकियेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

२. इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज या कार्यालयाच्या http://bombayhighcourt.nic.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ०६/११/२०१८ सकाळी ११.०० वाजेपासून** ते **दिनांक १५/११/२०१८ सायंकाळी ५.००** वाजेपर्यंतच्या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.

३. ऑनलाईन अर्ज करतांना उमेदवाराने स्वतःच्या अद्यावत पासपोर्ट फोटोची आणि स्वाक्षरीची स्वतंत्र ४० KB पेक्षा जास्त साईज होणार नाही अशी .jpg/.jpeg format मध्ये स्कॅन फाईल तयार करून ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे.

४. ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना http://bombayhighcourt.nic.in

या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे अनिवार्य आहे. उमेदवाराने संपूर्ण जाहिरातीचे वाचन करूनच अर्ज भरावा. संपूर्ण भरलेला अर्ज Submit केल्यानंतर त्या अर्जाची Printout काढावी. Printout वर दिलेल्या जागेवर स्वतः चा अर्ज भरतांना Upload केलेला फोटो चिटकवावा आणि विहित जागेवर काळ्या पेनाने स्वाक्षरी करावी. सदरील अर्ज उमेदवाराने स्वतः जवळ जतन करून ठेवावा. **सदरील अर्ज आणि शैक्षणिक कागदपत्रे या कार्यालयात पोष्टाने पाठवू नये.** मात्र निवड प्रक्रियेदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक त्या-त्यावेळी सदरील अर्जाची प्रत उपलब्ध करावी.

५. उमेदवाराने एकापेक्षा जास्त ऑनलाईन अर्ज सादर केल्यास त्याचा **शेवटचा** अर्जच फक्त विचारात घेण्यात येईल.

६. सेवायोजन कार्यालयात नोंदणी केलेल्या उमेदवारांनी, ते सदर पदासाठी पात्र असल्यास, विहित नमुन्यातच ऑनलाईन अर्ज करावा.

**क)** **अर्ज शुल्क भरण्याची पध्दत** :-

१. उमेदवारांना अर्ज शुल्क म्हणून रु. २००/- एवढी रक्कम SBI-Collect या ऑनलाईन प्रक्रियेद्वारे (https://www.onlinesbi.com/sbicollect/icollecthome.htm), **प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद** यांच्या खात्यात जमा करावी लागेल. सदरील शुल्क ही ना-परतावा (Non-refundable) असेल.

२. केवळ एखाद्या उमेदवाराने वरील पध्दतीने अर्ज व अर्ज शुल्क सादर केल्यामुळे त्याला वाहनचालक पदासाठीच्या निवड प्रक्रियेतील चाचणी परीक्षा अथवा प्रात्यक्षिक परीक्षेकरिता हजर राहण्याचा अधिकार असणार नाही.

३. उमेदवारांना सूचित करण्यात येते की, ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी त्यांनी “SBI Collect” facility मधील सूचनांचे (**'User Manual'** for online payment) पालन करावे.

४. ज्या अर्जाद्वारे या कार्यालयास ऑनलाईन शुल्क प्राप्त होईल, अशाच अर्जांचा सदरील निवड प्रक्रियेत विचार करण्यात येईल.

५. “SBI Collect” facility द्वारे शुल्क दाखल करताना येणा-या कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही अथवा त्यासंदर्भात कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

ड) <u>अल्पसूची (Shortlisting)</u> :-

१. सदरील पदाकरीता यापूर्वीच्या जाहिरातीनुसार प्राप्त झालेले अर्ज तसेच या जाहिरातीद्वारे प्राप्त होणा-या अर्जांच्या एकूण संख्येनुसार उमेदवारांची अल्पसूची (Shortlisting) करण्याचे सर्व अधिकार उच्च न्यायालय प्रशासन स्वतः कडे राखून ठेवत आहे.

२. ज्या उमेदवारांची नांवे अल्पसूचीमध्ये आहेत अशांनाच पुढील प्रकियेकरिता बोलावले जाईल. सदरील पात्र उमेदवारांची अल्पसूची मुंबई उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

इ) <u>उमेदवारांसाठी आवश्यक सूचना :-</u>

१. उमेदवाराने केवळ अर्ज दाखल केला यावरुन त्याला परीक्षेचा/मुलाखतीचा अथवा नेमणुकीचा हक्क असणार नाही.

२. अल्पसूचीतील उमेदवारांना सर्वप्रथम लेखी परीक्षा द्यावी लागेल. लेखी परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकेमध्ये खालील विषयांवर आधारित बहुपर्यायी प्रश्न असतील --

   १. वाहतूकीचे नियम, वाहनांची देखभाल व किरकोळ दुरुस्तीविषयक ज्ञान
   २. औरंगाबाद शहरातील स्थळे व रस्त्यांची माहिती
   ३. सामान्य ज्ञान

३. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच मोटर वाहन प्रात्यक्षिक परीक्षेस बोलाविले जाईल. मोटर वाहन प्रात्यक्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच तोंडी मुलाखतीसाठी बोलावले जाईल. परीक्षेसंबंधीची माहिती तसेच परीक्षेचे वेळापत्रक वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द केले जाईल.

४. लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मोटार वाहन प्रात्यक्षिक परीक्षेस बोलाविण्यात येणार नाही, तसेच मोटर वाहन परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना वैयक्तिक मुलाखतीस बोलाविण्यात येणार नाही. उमेदवाराची अंतिम निवड ही लेखी परीक्षा, मोटार वाहन प्रात्यक्षिक परीक्षा, उमेदवाराचा पूर्वानुभव व मुलाखत यातील एकूण गुणसंख्येवर अवलंबून राहील.

५. **अल्पसूचीतील उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र व सविस्तर सूचना पत्र मुंबई उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. <u>त्यांनी ते स्वतः Download करुन घ्यावे.</u>** परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणि पडताळणीसाठी ऑनलाईन अर्जाची प्रत व आधार कार्ड/पॅन कार्ड/वाहन परवाना इ. ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश

*दिला जाणार नाही.*

६. ***मोटर वाहन प्रात्यक्षिक परीक्षेच्यावेळी उमेदवाराजवळ वर परिच्छेद अ(४) व अ(७) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वैध वाहन परवाना असणे बंधनकारक आहे.***

७. *पात्र उमेदवारांना लेखी परीक्षा, मोटर वाहन प्रात्यक्षिक परीक्षा व मुलाखतीसाठी दिलेल्या तारखांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल.*

८. *मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी मुलाखतीस येतांना, त्यांच्या ऑनलाईन अर्जाच्या दोन प्रती आणि खालील कागदपत्रांच्या मूळ प्रती व दोन सत्यप्रती सादर कराव्यात :-*

a. *शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षांची गुणपत्रके व प्रमाणपत्रे.*

b. *जन्मतारखेचा दाखला -- जसे की, जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला अथवा तत्सम प्रमाणपत्र.*

c. *उमेदवार मागासवर्गीय असल्यास सक्षम अधिका-याने प्रदान केलेला जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र.*

d. *महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र* (Domicile Certificate).

e. *वैध वाहन परवान्याची* (Driving License) *प्रत.*

f. *परिच्छेद अ(४) व अ(७) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मोटर वाहन चालविण्याचे किमान ३ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र -- प्रमाणपत्रावर जारी करणा-या संस्थेचे/संस्थाप्रमुखाचे/व्यक्तीचे नांव, स्वाक्षरी, पत्ता तसेच शिक्का असणे आवश्यक आहे.*

g. *वाहन दुरुस्ती/देखभालीचे ज्ञान असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र -- प्रमाणपत्रावर जारी करणा-या संस्थेचे/संस्थाप्रमुखाचे/व्यक्तीचे नांव, स्वाक्षरी, पत्ता तसेच शिक्का असणे आवश्यक आहे.*

h. *ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी प्रदान केलेले उमेदवाराच्या चारित्र्याविषयीची प्रमाणपत्रे (प्रतिष्ठित व्यक्तीच्या नांव, स्वाक्षरी, पत्ता, हुद्दा, संपर्क कमांक व शिक्क्यासह). सदरील प्रमाणपत्रे जाहिरात प्रसिध्दीनंतरच्या तारखेची असावी. सदरील प्रतिष्ठित व्यक्ती ही उमेदवाराची जवळची नातेवाईक/मित्र नसावीत.*

i. *उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, संबंधित कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र.*

j. *सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.*

k. *विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र.*

९. *कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल झाल्यास अथवा काही तांत्रिक व खंडपीठ प्रशासनाच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे भरती प्रकिया रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेच्या प्रकारात बदल*

करणे, परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे किंवा अंशतः बदल करणे याबाबत सर्व अधिकार खंडपीठ प्रशासनाने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.

१०. निवड प्रकिया सुरू झाल्यानंतर कोणत्याही पातळीवर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रकियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल किंवा नियुक्ती झाली असल्यास नेमणूक रद्द करण्यात येईल. नियुक्तीचे सर्व अधिकार खंडपीठ प्रशासनाने स्वतः कडे राखून ठेवले आहे.

११. निवड प्रकियेसंदर्भात निवड समिती अथवा प्रशासनातील कोणत्याही अधिका-यावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दबाव आणणा-या उमेदवाराचा अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच त्याचेविरुध्द नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल. यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१२. भरती प्रकियेसंदर्भात निर्गमित होणा-या इतर सूचनांसाठी उमेदवाराने वेळोवेळी या कार्यालयाच्या संकेतस्थळास भेट द्यावी.

१३. सदर जाहिरात मुंबई उच्च न्यायालयाचे संकेतस्थळ http://bombayhighcourt.nic.in वर आणि मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद या कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

मुंबई उच्च न्यायालय, {}<br>
खंडपीठ औरंगाबाद, औरंगाबाद. {} स्वाक्षरीत/-<br>
दिनांक : ०६/११/२०१८ {} **प्रबंधक (प्रशासन)**

# DECLARATION

## FORM – A

I, Shri/Smt./Kum. ______________________________ son/daughter/wife of Shri ____________________________________________ aged ________ years, resident of ___________________________________________________________ ____________________________________________________________ do hereby declare that :-

1. I have applied for the post of Staff Car Driver.
2. I have ________ (Number) living children as on today out of which ______ No. of children born after 28th March, 2005 ________________________ (Mention dates of birth, if any).
3. I am aware that, if the total number of living children are more than two due to the children born after 28th March 2006, I am liable to be disqualified for the said post.

Place :-

Date :- / / 2018 Name & Signature of applicant

**Note :** The above Declaration should also be filled in by unmarried candidate stating 'not applicable' at respective places.

**FORM - B**

**Character Certificate**

Certified that Shri/Smt./Kum. ______________________________ son/ daughter/ wife of Shri __________________________________________, R/o _______________ _________________________________________ is well known to me since last _____________ years. To the best of my knowledge and belief he/she bears a good moral character and has nothing adverse which debars his/her suitability for Government job. He/She is not my relative.

Place :- _______________

Date :- / / 2018

Seal/Stamp (if any)

Signature ____________________

Name ______________________

Address _____________________

______________________________

______________________________

Mob. No. : ____________________

# ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना

१. ऑनलाईन अर्ज भरणे सुरू करण्यापूर्वी उमेदवाराने वाहनचालक पदासंबंधीची संपूर्ण जाहिरात वाचावी. ऑनलाईन अर्ज हा इंग्रजी भाषेत भरला जाईल.

२. ऑनलाईन अर्ज भरणे सुरू करण्यापूर्वी उमेदवाराने स्वतः चा अद्यावत पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी स्वतंत्र स्कॅन करून ४० केबीपेक्षा जास्त साईज होणार नाही अशी jpg / jpeg format मध्ये दोन वेगवेगळ्या फाईल्स तयार ठेवाव्यात.

३. ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

४. उमेदवाराने माहिती भरतांना नांवाची स्पेलिंग त्याच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचुक नमुद करावे.

५. उमेदवाराने पत्रव्यवहाराचा सविस्तर पत्ता व अचुक पिनकोड कमांक द्यावा, मोघम किंवा अर्धवट पत्ता देऊ नये.

६. उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल, मोबाईल कमांक द्यावा.

७. उमेदवाराने आपली जन्मतारीख शैक्षणिक कागदपत्रे/जन्मप्रमाणपत्राधारे अचुक लिहावी.

८. उमेदवार विवाहित असल्यास, त्याने अपत्यांविषयीची योग्य ती माहिती त्या-त्या रकान्यात भरावी. विवाहित उमेदवारास आज रोजी अपत्य नसेल तर त्याने रकान्यात **"0"** (शून्य) अशी माहिती भरावी.

९. उमेदवाराने स्वतः चा आधार कार्ड कमांक अचुक नमूद करावा.

१०. उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी.

११. उमेदवारांस ज्या भाषांचे ज्ञान आहे त्यांची नोंद करावी.

१२. उमेदवारास वाहन चालविण्याचा अनुभव असल्यास तो नमूद करावा.

१३. उमेदवाराने त्याच्याकडे असणा-या वैध वाहन परवान्याची संपूर्ण व अचूक माहिती भरावी.

१४. उमेदवाराकडे वाहनाची देखभाल व किरकोळ दुरुस्तीचे ज्ञान/अनुभव असल्यास त्याबद्दलची माहिती भरावी.

१५. उमेदवाराने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात आपले नांवाची नोंदणी केली असल्यास, नोंदणी कमांक, नोंदणी दिनांक आणि नोंदणी जिल्हा नमुद करावा.

१६. उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी. खरी माहिती दडवून ठेवल्यास उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरेल. नियुक्तीनंतर सदर माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नौकरीवरून कमी केले जाईल.

१७. उमेदवाराच्या कुटूंबातील व्यक्तींपैकी जर कोणी न्यायिक विभागात जसे की, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय, इतर न्यायालये, प्राधिकरण इ. ठिकाणी कार्यरत असेल तर त्यासंबंधी माहिती घावी.

१८. उमेदवाराने त्याला ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तीकडून चांगली वर्तणुक व चारित्र्याबाबतचा दाखला प्राप्त करावा आणि अर्ज भरतांना सदरील व्यक्तींची माहिती अर्जात नमूद करावी. सदरील दाखला हा जाहिरात प्रसिध्दीनंतरच्या तारखेचा असावा. सदरील प्रतिष्ठित व्यक्ती ही उमेदवाराची जवळची नातेवाईक/मित्र नसावी.

१९. उमेदवाराने अर्ज शुल्क म्हणून रु. २००/- एवढी रक्कम "SBI Collect" facility द्वारे भरणे अनिवार्य आहे. ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी त्यांनी "SBI Collect" facility मधील सूचनांचे **('User Manual'** for online payment) पालन करावे.

२०. उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, ४० केबी पेक्षा कमी आकार असलेल्या स्वतः च्या स्कॅन फोटोची .jpg / .jpeg format मधील फाईल Upload करावी.

२१. उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, ४० केबी पेक्षा कमी आकार असलेल्या स्वतः च्या स्कॅन स्वाक्षरीची .jpg / .jpeg format मधील फाईल Upload करावी.

२२. अर्ज Submit करण्यापूर्वी उमेदवाराने भरलेला अर्ज बरोबर आहे याची खात्री करावी व नंतरच I Agree या बटणावर Click करावे. अर्ज Submit झाल्यावर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

२३. अर्ज Submit झाल्यानंतर येणारा Registration Number उमेदवाराने नमूद करून घ्यावा आणि Print Application हे ऑप्शन Select करून ऑनलाईन अर्जाची Print out काढावी.

२४. सदरील Print out काढल्यानंतर शेवटी दिलेल्या जागेवर उमेदवाराने आपला स्वतः चा फोटो चिटकवावा आणि सोबतच्या रकान्यामध्ये काळया पेनाने स्वतः ची सही करावी. सदरील Print out उमेदवाराने आपल्याकडे पुढील कार्यवाहीसाठी जतन करून ठेवावी.

--------------------